समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार दि. १/१/२००६ ते ३१/०३/२०१० या कालावधीतील फरकाची रक्कम अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सकाम-२०१७/प्र.क्र.२०१/सामासु
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३ मार्च, २०१८.

<u>वाचा</u> १) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सकाम२००९/ प्र.क्र. १७२ भाग-१/सुधार १ दि. ८ मार्च २०११.

२) याचिका क्र. ४०४८/२०१३ मधील मा. उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर याचे दिनांक ५/१२/२०१७ चे आदेश.

३) आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचे पत्र क्र.सआशिक्षण/सकाम/रिट याचिका/ ४०४८/ २०१३/ माहिती/का-५ ब/१८७ दि.११/१/२०१७.

<u>प्रस्तावना -</u>

महाराष्ट्र राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखाली एकूण ५० समाजकार्य महाविद्यालये अनुदान तत्त्वावर कार्यरत असून सदर महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णय दिनांक ८/३/२०११ अन्वये ६ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. समाजकार्य महाविद्यालयातीत कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन संरचना मंजूर करण्यात आलेली आहे. तथापि दि. १/१/२००६ ते दि.३१/०३/२०१० या कालावधीतील थकबाकी संबंधितांना अनुज्ञेय असणार नाही असे आदेश दिलेले होते. सदर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दिनांक १/१/२००६ ते दि.३१/०३/२०१० या कालावधीतील थकबाकी मिळण्यासाठी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र. ४०४८/२०१३ दाखल केली होती. या याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत की, समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार दि. १/१/२००६ ते दि.३१/०३/२०१० या कालावधीतील थकबाकीची रक्कम ३ महिन्यात म्हणजेच दिनांक ५ मार्च, २०१८ पर्यंत अदा करण्यात यावी. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार दि. १/०१/२००६ ते दि. ३१/०३/२०१० या कालावधीतील फरकाची रक्कम अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

याबाबतचा होणारा खर्च मागणी क्र. एन.-३, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, ८०० इतर खर्च (०३) (०१) समाजकल्याण संस्थाना अनुदाने ३५, सहायक अनुदान (२२३५-१५०-३) या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०३१७४८१८७१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2018.03.03 17:27:23 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. महालेखापाल,महाराष्ट्र राज्य (१/२) (लेखा अनुज्ञेयात/लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. वित्त विभाग (का-सेवा ९), मंत्रालय, मुंबई - ३२.
७. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
८. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
९. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१०.निवडनस्ती/सामासु .